# लातूर शहर महानगरपालिका, लातूर

एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी

मा.आयुक्त यांचे कार्यालय (आरोग्य विभाग)

फोन- 02382 242803, 256899 फॅक्स- 02382-246074

वेबसाईट- www.mclatur.org email:moh.mclaturcorp@gmail.com


जाक्र/लाशमनपाला/आरोग्य विभाग/ 59 /2023-24 दिनांक 23/02/2024

## सुचना

**संदर्भ:- मा.सहसंचालक आरोग्य सेवा (हिवताप, हत्ती रोग व जलजन्य रोग ), पुणे यांचे पत्र जाक्र./संआसे/आस्था/कक्ष-५२अ/आ.क/आरोग्य निरीक्षक पदभरती/ मार्गदर्शक सुचना / २०२४/७९९५-८०७७ / दिनांक २०/०२/२०२४**

मा.सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्ती रोग व जलजन्य रोग ), पुणे यांनी दिनांक २०/०२/२०२४ च्या पत्रानुसार आरोग्य कर्मचारी पुरुष, आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक पदभरतीसाठी स्वच्छता निरीक्षक या अभ्यासक्रमाची मान्यता प्राप्त संस्थाची यादी कळविली आहे. तसेच यादीत कळविलेल्या संस्था व्यतिरिक्त इतर संस्थामधुन उमेदवारांनी प्रमाणपत्र धारण केले असल्यास त्या संस्थेला केंद्र अथवा महाराष्ट्र शासनाच्या ज्या विभागाची मान्यता आहे तो शासन निर्णय संबधित उमेदवारांनी पुरावा म्हणुन सादर करणे आवश्यक राहील असे कळविले आहे. संदर्भिय पत्र व पत्रासोबतची मान्यता प्राप्त संस्थाची यादी या सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी सध्या यासोबत प्रसिध्द करण्यात येत असलेल्या प्राथमिक स्वरुपातील पात्रता यादीमधील ज्या उमेदवारांनी यादीत कळविलेल्या संस्था व्यतिरिक्त इतर संस्थामधुन स्वच्छता निरीक्षक हा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले आहे अश्या उमेदवारांनी संबधित संस्थेला केंद्र अथवा महाराष्ट्र शासनाच्या ज्या विभागाची मान्यता आहे तो शासन निर्णय 3 दिवसाच्या आत पुरावा म्हणुन सादर करावा, **त्यानंतरच अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येईल याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती,**
**लातूर शहर महानगरपालिका,लातूर**

दि. 23/2/24 रोजीच्या प्रसिद्ध

वरील "सुचनेनुसार" दि. 27/2/2024 रोजी आज फक्त स्टाफ नर्स यांच्या निवड यादी व प्रतिक्षा यादी (जात प्रवर्ग निहाय) प्रसिद्ध करण्यात येत आहे व उद्या मूळ कागदपत्र पडताळणीसाठी फक्त निवड यादीतील स्टाफ नर्स यांनी मूळ कागदपत्रासह उपस्थित रहावे.

MPW यांची अंतिम पात्रता यादी वरील सुचनेनुसार नंतर प्रकाशित केली जाणार आहे व त्यामुळे उद्या MPW यांनी उपस्थित राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.